# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १४१ वा ❑ गुरूवार दि.१७ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## बनावट न्यायाधीश आणि बनावट न्यायालय...

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्यं

बनावट वस्तू, दस्तऐवज, किंवा इतर गोष्टींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. बनावट सौंदर्य प्रसाधने, कपडे, औषधे, खते आणि इतर उत्पादने बाजारात विकली जातात. बनावट कागदपत्रे, बनावट प्रमाणपत्रे, ओळखपत्रे, आणि इतर कागदपत्रे तयार केली जातात. एवढेच नव्हे तर बनावट मतदान देखील होत आहे.ज्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. अनेकांची फसगत होत आहे.एखाद्या वस्तूंची व ओळख पत्रांचा बनवटपणा आपण समजू शकतो.मात्र बनावटपणा आता न्यायालयापर्यंत पोहोचलेला आहे .गुजरात मध्ये एका व्यक्तीने चक्क बनावट न्यायालय तयार करून अनेक निर्णय दिलेले आहेत.

गुजरातमधील अहमदाबादमधून एका व्यक्तीने बनावट न्यायाधीश असल्याचे भासवल्याचा प्रकार समोर आला आहे. त्या व्यक्तीने बनावट न्यायाधीश असल्याचे भासवले आणि एका वादग्रस्त जमिनीवर निकालही दिला. आरोपीचे नाव मॉरिस सॅम्युअल आहे. मध्यस्थ म्हणून, बनावट न्यायाधीश मॉरिसने अब्जावधी रुपयांची सुमारे १०० एकर सरकारी जमीन त्याच्या नावावर हस्तांतरित करण्याचे आदेश दिले.

विशेष म्हणजे हे बनावट न्यायालय गेल्या ५ वर्षांपासून सुरू होते. ५ वर्षापासून बनावट न्यायालयाचा सुगावा पोलिसांना लागला नाही.. पोलिस काय करत होते? थोडा जरी सुगावा लागला तर पोलिस आधीच पोहोचता..मात्र न्यायालयीन परिसरात तब्बल एक व्यक्ती बनावट न्यायालय स्थापन करून पक्षकारांना निर्णय देत होता...याबाबत पोलिस कशी अनभिज्ञ ? न्यायालय परिसरात इतर न्यायाधिशांना व वकिलांना देखील याचा पत्ता लागला नाही..ही फार मोठी आश्चर्याची बाब आहे..

अहमदाबाद पोलिसांनी बनावट न्यायाधीश असल्याचे भासवून लोकांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली मॉरिसला अटक केली आहे. कार्यालयाला बनावट न्यायालय बनवण्यात आले होते असे सांगितले जात आहे की मॉरिस जमिनीच्या वादाचे खटले प्रलंबित असलेल्या लोकांना अडकवत असे आणि हे सर्व खटले शहरातील दिवाणी न्यायालयात प्रलंबित होते, यासोबतच तो त्याच्या क्लायंटकडून त्यांचे खटले सोडवण्यासाठी फी म्हणून काही पैसे घेत असे, तो अनेकदा क्लायंटना गांधीनगर येथील त्याच्या ऑफिसमध्ये बोलावत असे. हे कार्यालय अगदी न्यायालयासारखे डिझाइन केलेले होते. अहमदाबादमधील एका जमिनीच्या वादातील तक्रारीनंतर हे उघड झाले. पोलिसांच्या अहवालानुसार, ख्रिश्चनने अहमदाबादमध्ये बनावट मध्यस्थी केंद्र स्थापन केले आणि सरकारी जमिनीशी संबंधित आदेश जारी केले. त्याने स्वतःला न्यायाधीश म्हणून सादर केले, ज्यामुळे अनेक लोकांना असे वाटले की ते कायदेशीर कायदेशीर कार्यवाही करत आहेत. ख्रिश्चनने खोलीला खऱ्या कोर्टात रूपांतरित केले. लोकांना असे वाटावे की ते खऱ्या कोर्टात आपला खटला लढत आहेत, यासाठी त्याने आपल्या सहकाऱ्यांना कोर्ट कर्मचारी म्हणून नियुक्त केले. इतकेच नाही तर लोकांना असे वाटावे की त्यांनी खरोखरच आपला खटला जिंकला आहे, यासाठी तो मोठी फी आकारून निकाल देत असे.

सुरुवात कशी केली?

जुलै २००७ मध्ये, मॉरिस सॅम्युअल ख्रिश्चनने बार कौन्सिलमध्ये कायदेशीर परवान्यासाठी अर्ज केला. तथापि, डिसेंबर २००७ मध्ये त्याच्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर, तो आवश्यक पात्रता पूर्ण करत नसल्याचे निश्चित झाले.

तपासादरम्यान, पोलिसांना असे आढळून आले की मॉरिस सॅम्युअल ख्रिश्चनने २००२ मध्ये एलएलबी पदवी आणि नवी दिल्लीतील ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनमधून बी.कॉम पदवी मिळवली होती, जी बार कौन्सिल ऑफ इंडियाने मान्यता दिलेली नाही. म्हणजेच, हे प्रकरण देखील बनावट असल्याचे निष्पन्न झाले.गुजरात बार कौन्सिलने आंतरराष्ट्रीय बार कौन्सिलमधील सदस्यत्वाचा त्यांचा दावा फेटाळून लावला आणि स्पष्ट केले की अशा सदस्यत्वामुळे कोणालाही भारतीय न्यायालयांमध्ये वकिली करण्याचा अधिकार मिळत नाही.

गांधीनगर जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी आरोपी वकिलाचा बनावट कोर्ट रूम सील केला होता, परंतु काही काळानंतर त्यांनी तो पुन्हा सुरू केला. २०१९ मध्ये, ख्रिश्चनने पालदी परिसरातील एका भूखंडाशी संबंधित महसूल नोंदींमध्ये त्याचे नाव जोडण्याचा प्रयत्न करताना सरकारी जमिनीच्या मालकीचा दावा करणाऱ्या एका क्लायंटच्या बाजूने आदेश दिला. कोणत्याही अधिकृत मंजुरीशिवाय, ख्रिश्चनने त्याच्या क्लायंटला सरकारने त्याला अधिकृत मध्यस्थ म्हणून नियुक्त केले आहे असे पटवून दिले. भद्रा येथील शहर दिवाणी न्यायालयाचे रजिस्ट्रार हार्दिक देसाई यांनी अहमदाबादमधील करंज पोलिस ठाण्यात ख्रिश्चनविरुद्ध तक्रार दाखल केली तेव्हा हा फसवणूकीचा प्रकार उघडकीस आला. मॉरिस सॅम्युअल ख्रिश्चन सरकारी अधिकाऱ्यांसमोर किंवा न्यायालयासमोर स्वतःला न्यायालयीन मध्यस्थ म्हणून ओळख देत असे. अहमदाबाद पालदी येथील बाबूजी छनाभाई ठाकोर यांच्या जमिनीचा ताबा घेण्यासाठी मॉरिसने स्वतःच्या बनावट न्यायालयातून स्वतःच्या बाजूने निर्णय दिला, त्यानंतर शहर दिवाणी न्यायाधीशांच्या न्यायालयाने विचारले की हा आदेश कोणी आणि कोणत्या कागदपत्रांच्या आधारे दिला. त्यानंतर त्याची फसवणूक उघडकीस आली. न्यायालयाच्या निर्देशानुसार मॉरिसविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आणि त्याला अटक करण्यात आली. पुढील तपास सुरू आहे






# जीवनाचे गहन संदेश सोप्या स्वरूपात – डॉ. विद्या प्रसाद मिश्रा

## गीता झा यांच्या ‘यथार्थ की खोज में’ पुस्तकाचे दिल्लीत प्रकाशन

ज्योतिर्मय साहित्य

**दिल्ली** – दिल्लीच्या प्रसिद्ध हिंदी लेखिका आणि कवयित्री गीता झा यांनी त्यांचे २४ वे पुस्तक यथार्थ की खोज में प्रकाशित केले. हे पुस्तक कमी प्रसिद्ध असलेल्या दारण्यक उपनिषदातील आध्यात्मिक संदेश सोप्या भाषेत कवितेच्या स्वरूपात सादर करते. हे पुस्तक कठीण परिस्थितीत सुज्ञपणे कसे जीवन जगावे आणि वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांशी व्यवहार करताना कोणती खबरदारी घ्यावी हे स्पष्ट करते. तसेच, समाजातील महिलांच्या स्थितीकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

पुस्तक प्रकाशन समारंभात, दिल्ली संस्कृत अकादमीचे माजी सचिव डॉ. धर्मेंद्र शास्त्री म्हणाले, ‘‘हे पुस्तक सामान्य लोकांसाठी बृहदारण्यक उपनिषदाचे सार अतिशय सोप्या आणि मनोरंजक पद्धतीने सादर करते. हे कठीण परंतु महत्त्वाचे मजकूर समजून घेण्यास मदत करते.‘‘

त्याच वेळी, इंदिरा गांधी नॅशनल सेंटर फॉर द आर्ट्सच्या सल्लागार डॉ. विद्या प्रसाद मिश्रा म्हणाल्या, ‘‘या पुस्तकात उपनिषदाच्या ६ महत्त्वाच्या अध्यायांशी संबंधित जीवनाचे गहन संदेश सोप्या स्वरूपात सादर केले आहेत. ही निर्मिती समाजाला एक नवीन दिशा देऊ शकते.‘‘ गीता झा यांनी यापूर्वी जीवन-मृत्यू, जब आयी कविता मिलने, आत्मेश्वर और सफलता, बचपन से पचपन तक आणि कृष्णा या अर्जुन नहीं, मैं हूं आम आदमी अशी लोकप्रिय पुस्तके लिहिली आहेत. ती वयाच्या १३ व्या वर्षापासून कविता लिहित आहे आणि तिच्या कलाकृती गुरुकुल, आर्य समाज समुदाय आणि हिंदी साहित्य प्रेमींमध्ये खूप लोकप्रिय आहेत. विशेष म्हणजे लेखकाच्या सर्व कलाकृती असलेली पुस्तके या महिन्याच्या अखेरीस ऑनलाइन प्लॅटफॉर्म वर उपलब्ध होतील.

यथार्थ की खोज में हे एक असे पुस्तक आहे जे आध्यात्मिक ज्ञान आणि जीवनातील व्यावहारिक अनुभवांना सुंदरपणे एकत्र करते.



# ‘विकसित महाराष्ट्र २०४७’ साठी सर्वेक्षणामध्ये मत नोंदवण्याची आजची शेवटची तारीख

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – ‘विकसित महाराष्ट्र २०४७’ चे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी विविध १६ क्षेत्र निहाय नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण करण्यात येत आहे. नागरिकांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्युआर कोडवर आपले मत नोंदवून विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे. या सर्वेक्षणामध्ये नागरिकांची कोणतीही वैयक्तिक माहिती संकलित करण्यात येणार नाही. https://wa.link/o93s9m या लिंकवर आपले मत नोंदवावे, असे आवाहन नियोजन विभागाकडून करण्यात आले आहे.विकसित महाराष्ट्राच्या सर्वेक्षणात पावणेदोन लाख पेक्षा अधिक लोकांनी सहभाग घेतला आहे. विकसित महाराष्ट्र सर्वेक्षणात सहभागी होण्याचा आज दिनांक १७ जुलै २०२५ अंतिम दिवस आहे.

भारत सरकारकडून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला सन २०४७ पर्यंत विकसित भारत –भारत२०४७ करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन २०२९ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर व सन २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविणे हे राज्याचे ध्येय आहे. राज्याच्या ध्येयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने तसेच प्रत्येक क्षेत्राचा ठसा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर उमटावा यासाठी विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन जाहीर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

व्हिजन डॉक्युमेंट तयार करताना दीर्घकालीन, मध्यमकालीन व अल्पकालीन अशी टप्पानिहाय उद्दिष्टे ठेवण्याचे निर्देश सर्व विभागांना देण्यात आले आहेत. व्हिजन डॉक्युमेंट चा आराखडा तयार करण्यासाठी १६ संकल्पनांवर आधारित क्षेत्रनिहाय गट बनविण्यात आले आहेत. यामध्ये कृषी, शिक्षण, आरोग्य, ग्रामविकास, नगरविकास, भूसंपदा, जलसंपदा, पायाभूत सुविधा, वित्त, उद्योग, सेवा, सामाजिक विकास, सुरक्षा, सॉफ्ट पॉवर, तंत्रज्ञान व मानव विकास/मनुष्यबळ व्यवस्थापन असे क्षेत्रनिहाय गट असतील. या सर्व गटांनी प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक व सुशासन यावर आधारित आराखडा तयार करावयाचा आहे. आराखडा तयार करताना त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती, शासकीय/अशासकीय संस्थांशी सल्लामसलत करण्यात येणार आहे.

विकसित महाराष्ट्राच्या व्हिजनमध्ये नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण अभियानाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १७ जून, २०२५ रोजी करण्यात आले आहे. सर्वेक्षणामध्ये सर्व नागरिकांनी आपले अभिप्राय नोंदवावेत यासाठी सर्व आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी पासून गावपातळीवरील कार्यालय प्रमुखांनी प्रयत्न करावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यामध्ये नागरिकांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्युआर कोडवर आपले मत नोंदवून विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे. या सर्वेक्षणामध्ये सहभाग घेतलेल्या नागरिकांची कोणतीही वैयक्तिक माहिती संकलित करण्यात येणार नाही.

# स्वरचंद्रिका – एक सांगीतिक प्रवास

ज्योतिर्मय साहित्य






**प्रकाशनाच्या निमित्ताने...**

✍अरुण पुराणिक



स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात रंगलेला, प्रेक्षणीय, श्रवणीय आणि अविस्मरणीय सोहळा! निमित्त होते, ‘पद्मविभूषण’ पंडित रामनारायण, ‘पद्मविभूषण’ पंडित जसराज, ‘पद्मश्री’ पंडित हृदयनाथ मंगेशकर यांची लाडकी शिष्या, ४५ वर्षांची अखंड संगीतसाधना, देश विदेशातील शेकडो संगीत मैफिली गाजवणारी, ख्यातनाम गायिका ‘पद्मश्री’ पद्मजा फेणाणी जोगळेकर यांच्या सांगीतिक कारकीर्दीवरचा समग्र आलेख मांडणाऱ्या ‘‘स्वरचंद्रिका‘‘ गौरवग्रंथाचे प्रकाशन ! रविवार दि १३ जुलै !

थोडीशी पूर्वपीठिका ! सुनील आणि पद्मजा हे माझे ४० वर्षे जुने कौटुंबिक मित्र. पद्मजा गायिका आणि मी रसिक श्रोता व संगीत समीक्षक ! सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मी पद्मजाच्या सांगीतिक कारकीर्दीचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार ! तिच्या पहिल्या कॅसेट प्रकाशनाला, भारतरत्न माननीय अटलजी वाजपेयी यांच्या वाढदिवसाला, दिल्लीतील त्यांच्या कविता गायनाच्या ऐतिहासिक कार्यक्रमाला पद्मजा व सुनिलचा गेस्ट म्हणून मी हजर होतो. पद्मजाची एकसष्टी साजरी झाली, तेव्हा मी पद्मजाच्या मागे लागलो, थोडी विश्रांती घे आणि आपल्या आठवणी लिहून काढ. नंतर तुला कदाचित ते प्रसंग, घटना आठवणार नाहीत ! ती म्हणाली, तुला कल्पना तरी आहे का ? कसला टास्क आहे तो ? ४५ वर्षांतील आठवणी आणि प्रसंग तू मला लिहायला सांगतोस? मला ते काही जमेल असे वाटत नाही. पद्मजाने तिच्या नेहमीच्या बिझी शेडयुलमुळे माझी प्रेमळ सूचना मनावर घेतली नाही. मी पण हट्टाला पेटलो होतो. तिचे निरागस म्हणणे होते, कशाला एवढा डोंगर उपसायचा? मी तिला कविराज शैलेन्द्र यांच्या चार ओळी पाठवल्या,

‘रातें दसों दिशाओं से कहेंगी अपनी कहानियाँ, गीत हमारे प्यार के दोहराएँगी जवानियाँ। मैं न रहूँगी, तुम न रहोगे, फिर भी रहेंगी निशानियाँ। तिला आता माझे म्हणणे पटू लागले होते. मी आता शेवटचे अस्त्र काढले, तू स्वत:साठी करू नकोस ! निदान आदित्यच्या मुलांसाठी तरी कर, त्यांना तरी कळेल आपली आज्जी कशी ग्रेट होती आणि आहे ते. ही गोळी मात्र अचूक लागू पडली. तिला योगयोगाने डॉ. संगीता गोडबोले आणि मैत्रिणींची साथ मिळाली आणि गौरवग्रंथ आकार घेऊ लागला.

ज्या सोनियाच्या दिवसाची प्रतीक्षा होती, उत्सुकता होती अखेर तो दिवस, ती सकाळ उजाडली. भावगंधर्व पं. हृदयनाथ मंगेशकर, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर (सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ) आणि अशाच अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत, विविध क्षेत्रातील दोनशेहून अधिक दिग्गजांच्या समर्थ लेखणीतून उतरलेले प्रशंसापूर्व अनेक लेख, पत्रे, किस्से, छायाचित्रे यांनी नटलेला गौरवग्रंथ मोठ्या दिमाखात प्रकाशित झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष भावगंधर्व पं. हृदयनाथ मंगेशकर हे असे गौरवोद्गार काढले की, त्यांच्याकडे दस्तुरखुद्द भारतरत्न लता मंगेशकर यांनी असे सांगितले की. त्यांच्यानंतर कोणी चांगली गायिका असेल, तर ती म्हणजे पद्मजा फ ेणाणी-जोगळेकर !

चित्रपटसृष्टीत न रमता भावगीत, शास्त्रीय संगीतात ठसा उमटवणाऱ्या पद्मजा यांच्याविषयीचे हे पुस्तक म्हणजे गौरवग्रंथ आहे!’’ अशा शब्दांत पद्मजावर स्तुतिसुमनांची उधळण केली आणि गायिका, लेखिका आणि चित्रकार असलेल्या पद्मजाला थेट रवीन्द्रनाथ टागोर, संगीतकार सलील चौधरी यांच्या पंगतीत नेऊन बसवले. पद्मजाने अत्यंत विनयाने तिला गायिका म्हणून घडविणाऱ्या गुरू, आप्तजन, साथीदार, तिच्या संगीताचे चाहते, रसिक श्रोते यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. सरतेशेवटी आपल्या सांगीतिक मुलाखतीमधे पद्मजाने गीते, कविता व बंदिशी गाऊन रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. अक्षरशः दृष्ट लागेल असा कार्यक्रम झाला !

मी घरी जाताना पद्मजा सभोवती श्रोत्यांची गर्दी होती, त्यामुळे प्रत्यक्ष भेट झाली नाही. तिला दुरून पाहिले, इतक्या दिवसांच्या मेहनतीचे चीज झाले होते ! तिच्या चेहऱ्यावर स्वप्नपूर्तीचा आनंद आणि तृप्तीचे तेज झळकत होते. मला वाटते, ‘पद्मश्री’च्या तोडीस तोड असा हा बहुमान होता !



# जात्यावरच्या ओव्या......

---

सांगून धाडते
मायच्या मायीला
मोराचे पख
लाव चोळीच्या बाहीला ||१७०||

गाणं म्हण बाई
गाण्यान काय होतं ?
गाण्यामंधी गोत येतं
माझ्या जीवा करमत ||१७१||

---

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# माणूस भेटतो तेव्हा...




ज्योतिर्मय साहित्य

तो पुन्हा हसला. त्याच्या हसण्याने माझ्या काळजात कुठे तरी जखम झाल्यासारखी वाटली. शिकलेल्यानीच तर केली सारी गडबड. मूल्ये शाळेत, विद्यापीठात कुठे शिकवली जातात ? सगळे घोटाळे, भ्रष्टाचार शिकलेल्यांनीच तर केलेत ना ! पर्यावरणाचा नाश करणारा शिकलेलाच, इतरांच्या वाट्याचं आपण गिळंकृत करणारे शिकलेलेच, आईवडिलांना वृद्धाश्रमात ठेवणारे शिकलेलेच, ढोंगीपणा, दांभिकता सगळं सगळं कोण करतं ? शिकलेल्यांचे अजून किती पराक्रम सांगू ?‘‘



आता माझ्यापाशी उत्तर नव्हतं. शांत बसण्याशिवाय आता पर्याय नव्हता. तो पुढे म्हणाला, ‘‘ मित्रा, एवढं शिकला आहेस असं म्हणतो तर खान्देशमधील कवयित्री बहिणाबाईंचं नाव ऐकलं असशील ना ?‘‘

मी म्हणालो, ‘‘ हो माहिती आहे, बहिणाबाईच काय पण सगळे मोठमोठे कवी, लेखक मला माहिती आहेत. कुसुमाग्रज, बोरकर, तांबे, पाडगावकर, शांता शेळके, अत्रे, पु ल देशपांडे.. किती नावं सांगू ?‘‘

तो म्हणाला, ‘‘ राहू दे ही यादी. अरे त्या बहिणाबाई एक दिवसही शाळेत गेल्या नाहीत. पण त्या काय म्हणाल्या माहिती आहे ?‘‘

‘‘ काय म्हणाल्या बाबा त्या ?‘‘

अरे त्या म्हणाल्या, माणसा माणसा कधी होशील माणूस? तुम्ही माणूस असता तर त्यांना कशाला असं म्हणावं लागलं असतं ? त्या कधीही शाळेत गेल्या नव्हत्या म्हणून त्यांना हे कळलं बरं का !

मी म्हटलं, अरे, ती कविता आहे. सगळी माणसं कुठं वाईट असतात ? आम्ही माणसंच आहोत. आम्ही काय वाईट केलंय ?

तो पुन्हा थोडंसं कुत्सित हसला. म्हणाला, काय वाईट केलंय ? काय चांगलं केलंय हे विचार ? त्या बहिणाबाई एकदा छापखान्यात गेल्या होत्या. त्यांनी पाहिलं की तिथे कोरा कागद मशीनमध्ये टाकला की त्याच्यावर काहीतरी छापून येत होतं. त्या मशीनमधील उलट अक्षरांची आणि त्याची भेट अक्षरशः काही क्षणांचीच ना ! तरी पण तेवढया अक्षरांच्या संगतीनं तो कागद शहाणा झाला असं त्या म्हणतात.

माणसापरी माणूस
राहतो रे येडजाना
अरे होतो छापीसनी
कोरा कागद शहाणा.
पुढे त्या म्हणतात
जेवा इमान सचोटी
पापामधी रे बुडले
तेव्हा याच माणसानं
किल्ली कुलूप घडले. **(क्रमशः)**






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# गुरूनिश्चय

ज्योतिर्मय साहित्य

बाईला स्वातंत्र्य जरूर मिळाले पाहिजे पण तिने निसर्गाने दिलेले अत्युच्य पद ‘‘माता‘‘ पदाचा सन्मान कायम ठेवला पाहिजे. पाश्चातांचे अंधानुकरण करून स्वतःचे, संस्कृतीला तिलांजली मिळणार नाही. सासर,माहेरचा सन्मान कसा वाढेल हे सतत ध्यानात ठेऊन वागले पाहिजे.

तुझे विमानातील पाऊल असु दे, शास्त्रज्ञ असणे, पंतप्रधानपदी असलेली तू अभिमान आहेचं गं पण संसाराची जबाबदारी पार पाडताना तुला तारेवरची कसरत करावी लागते हे तर खरं आहे पण!

हवं ते खाण, पिणं, कपडे, कुठेही जाईन येईन. मला कुणी विचारायचा अधिकार नाही. ह्या अहंकारी किंवा अडेलतट्टू स्वभावाने हातात आलेले वैभव कमी होत आहे. या कडे सर्व स्त्री वर्गाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. अंगभर कपडे घालणे म्हणजे गबाळेपणा हा स्वतः विणलेला कोष आहे. गच्च बांधलेले केस अंगभर कपडे डोईवर पदर अशी मनात कुटूंब, समाज याबद्दल अतिशय कणव असलेली तुझी प्रतिमा बेछूट वागण्याने बदनाम होऊ देऊ नकोस. राजमाता जिजाऊ, अनेक क्रांतिकारी महिला. सावित्रीबाई फुले आनंदीबाई जोशी या अशा अनेकांच्या संघर्षातुन तू ईथपर्यन्त आली आहेस याचा विसर पडू देऊ नकोस. मी नाही म्हणत की तू नववार साडी नेस काळाबरोबर तू अवश्य बदल.पण पाळण्याची दोरी तुझ्याच हातात आहे हे निसर्गाने तुला दिलेले अमुल्य वरदान आहे. हे कधीच विसरू नकोस,. कुठल्याही गोष्टीचं अती झाले की त्याचीमाती होतेच, त्यासाठी तु स्वतःला सावर. तुझ्या पंखात खुप बळ आहे।तुला अजुनही खुप ऊंच भरारी घ्यायची आहे ती तु नक्कीच घेत आहे !पण ? स्वातंत्र्य आणि स्वैराचार या दोन शब्दांत अगदी बारीक रेषा आहे ती तुलाच पुसायची आहे. आयुष्य जगताना एक लक्ष्मणरेषेचं भय कायम ध्यानात ठेव .चांगल पेरत रहा चांगलेच ऊगवत रहाणार !कारण तू स्त्रीशक्ति आहेस आदिमायेचं रूप आहे आणि ही तर आपली भारतीय संस्कृती आहे तिला जोपासत स्वतःचं स्थान निर्माण कर ऊंचं ऊंच भरारी घेत रहा पण तुझ्या पिलांकडे दुर्लक्ष होऊ देऊ नकोस. स्वतः ला सांभाळ!कारण तु मायाळू ,दयाळू अशी कोमलमाता आहेस.

टिप, हा विचार सर्वाच्या साठी नाही, सुज्ञास अधिक सांगणे न लगे.

**(क्रमशः)**

# संतांच्या संगतीचा परिणाम



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जडीबुटीवाल्याजवळ एक गोळी असते. ज्याच्या अंगात विष भिनले आहे अशा माणसाच्या जखमेवर ती गोळी नुसती ठेवतात. ती सर्व विष शोषून घेते. नंतर तिला धुतली की ती पूर्ववत् होते. त्याचप्रमाणे सत्पुरुषाच्या संगतीत आपले पाप शोषून घेतले जाते, आणि पुन: तो सत्पुरुष स्वत: शुद्धच राहतो. सत्संगती मिळेल, पण ती टिकणे फार कठीण काम आहे. साधारणपणे ज्या विषयाची आपल्याला आवड असते तसलीच संगत आपण बघतो. मीच वाईट म्हणून मी वाईट लोकांची संगत धरतो. विषयात दोष नाही; म्हणजेच, नुसते विषय बाधक होत नाहीत, विषयी लोकांची संगत मात्र फार बाधक असते. संगतीने आपल्यावर बरावाईट परिणाम होतो. विषय मागूनही जो ते देत नाही, त्यांपासून परावृत्त करतो, तो संत. विषयतृप्तीसाठी जावे आणि निर्विषय होऊन यावे, हा संतसंगतीचा परिणाम. ज्याची संगत केली असताना भगवत्प्रेम प्रकट होते तो संत जाणावा. अशांची संगती केव्हा होईल ही तळमळ असावी. विषयाची गोडी फार; पण तो सुटावा असे वाटू लागले म्हणजे भजनपूजन करणाऱ्याची संगत धरावी. वाईट विचार मनात आले की नामाची जोड ठेवावी. आपला सर्वाठायी भगवद्भाव वाढू लागला म्हणजे संतांची प्रचीती येते. भगवंताच्या लीला पाहणाऱ्यांनाच खरा आनंद मिळतो. म्हणून संत नेहमी भगवंताविषयीच सांगत असतात. ते जे गातील तो संगीतातला रागच समजावा. तुकारामबुवा नुसते ‘विठ्ठल विठ्ठल’ म्हणत, पण त्याची गोडी आपल्या गाण्यामध्ये देखील नाही.

खरोखर संतांना आपल्याविषयी इतकी कळकळ असते, आपल्याला ती कळतही नाही. संत आपल्या हिताचे सांगतात, पण आपले मन विषयात वावरत असल्याने त्यांचे बोलणे आपल्या मनात पूर्णपणे ठसत नाही. औषध कडू असले तरी रोग झाल्यावर आपण ते घेतोच ना ? मग प्रपंचातल्या व्याधींनी त्रस्त होऊनही आपण संतांच्या हितकारक बोलण्याकडे का दुर्लक्ष करावे ? ज्याला भगवंताचे अधिष्ठान आहे त्याचे कडक बोलणेसुद्धा कुणाला लागणार नाही. अत्यंत निर्भयता हा संतांचा पहिला गुण आहे, कारण ‘सर्व ठिकाणी मीच आहे’ ही भावना झाल्यावर भयाचे कारणच उरत नाही. आईपण जसे सगळीकडे सारखे, त्याचप्रमाणे सर्व संत एकच भाषा बोलतात. संतांनी मिळवलेले पद मिळविण्याचे साधन आपणही करतो; पण त्यांचे करणे नि:संशय असते, तर उलट आपण नेहमी शंकाच व्यक्त करीत असतो. डोळ्यांत खुपणारा खडा काढण्यासाठी त्यात लोणी घालतात; त्याने न खुपता खडा बाहेर पडतो आणि डोळा थंड होतो. त्याचप्रमाणे संतांची वाणी गोड, मऊ, हितकारक असते; तसे आपण बोलावे.

आपली भूमिका थोडी तयार असल्यास सत्संगतीचा परिणाम होण्यास वेळ लागत नाही.

## ॥ संत महात्म्य ॥

**लेखक - मधुकर बोरीकर**
**9403061886**

# संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

या परावाणीतील एक माळ जप हा वैखरीतील कोट्यावधी जपा पेक्षा जास्त प्रभावी असतो. या परावाणीत जरी श्रवण असले तरी, शब्द काही प्रमाणात का होईना मनामध्ये शिल्लक असतात. मन हे अधिक शांत होत आलेले असते. पण तरीही शब्द योजना करता येते .आता या परेचाही पुढे मनाची जी निश्चल अवस्था असते, निर्द्वंद अवस्था असते यात विचारांचा उद्भव नसतोच. आता परेचेच बोलणे खुंटले म्हणजे म्हणजे मन निष्पन्द, निर्विचार ,स्तब्ध झाले ,अशा अवस्थेत आलेले अनुभव, दिसलेली दिव्य कांती वर्णन करायला वैखरी शिल्लक राहणारच नाही. मग कसे वर्णन करणार ?असे माऊली सांगत आहेत.

पाया पडू गेले तव पाऊलची न दिसे/ उभाची स्वयंभू असे समोर की पाठिमोरा न कळे /ठकची पडिले कैसे

माऊलींची साधना इतकी दृढ स्वरूपाची ती पांडुरंगाच्या चरणातून प्रस्फुटित होणाऱ्या दिव्य चैतन्याच्या महासागराला त्यांची श्रद्धा व समर्पण प्रचंड प्रमाणात खेचू शकत होते आपली श्रद्धा कमकुवत असेल भावावस्था जर हलकी असेल तर आपणास तितके तेज जाणवणार नाही. माऊलींना ते तेज इतक्या प्रमाणात जाणवत होते की त्यापुढे प्रत्यक्ष पांडुरंगाचे पाऊलही त्यांना दिसत नव्हते. समोरची छोटी मूर्ती आता त्यांना न दिसता त्या जागी प्रत्यक्ष परमात्मा स्वतःहून उभा आहे, तो इतका भव्य उंच आहे की त्याच्या मुखापर्यंत नजरही पोहोचू शकत नाही. इतकेच काय, तो सामोरा उभा आहे की पाठमोरा हेही स्पष्टपणे कळू शकत नाही. तो समोर आहे म्हणावे तर बाजूसही दिसतो आहे. आजूबाजूच्या सामान्य लोकांमध्येही तोच परमात्मा भरून व्यापला आहे. इतकेच नव्हे तर जड वस्तू मंदिराचे खांब, छत सर्वत्र तोच चैतन्य रूपाने प्रकटला आहे. हा अनुभव माऊलींना तेथे आला.या चकव्यामुळे मी भ्रमंतीत झालो आहे असे ते म्हणतात.

क्षेमा लागी जीव उतावीळ माझा म्हणवुनी स्फुरताती बाहो, क्षेम देऊ गेले तव मीच मी एकली असावला जीव राहो

माऊलींची भक्ती माऊलीच भगवंतावरील प्रेम हे प्रगाढ होते. या विशाल प्रेमातूनच त्यांना समोर उभ्या असलेल्या प्रत्यक्ष परमात्म्याला अलिंगन द्यावं म्हणून इच्छा झाली. त्यासाठी मन उतावीळ झाले. पण या अवस्थेत समोरचा परमात्मा गुप्त होऊन गेला. जेव्हा मी पणा जागा होतो तेव्हा परमात्मा निघून जातो. गोपिकांनाही ज्यावेळेस त्यांच्यातील मी पण जागा व्हायचा त्यावेळेस अखंडपणे त्यांचे सोबत राहणारा परमात्मा गुप्त होऊन जायचा. साधनेच्या या प्रवासात आपल्यातील मी संपवावा लागतो व केवळ परमात्मा शिल्लक राहू द्यावा लागतो. जेव्हा मनातील परमात्म्यास आलिंगन देण्याची इच्छा जागृत झाली त्या वेळेसच मन समाधीच्या अवस्थेतून खाली सरकले व मी पणा पुन्हा जीवीत झाला. आता ते एकटेच राहिले असे म्हणतात.

भगवंताशी कोणते तरी एक नाते बांधावे लागते तो तुमचा स्वामी आहे तो तुमचा पती आहे तो तुमचा मित्र आहे इतकेच काय तर तो तुमचा शत्रू आहे ,अशा कुठल्यातरी नात्यात त्याच्याशी सतत दृढ भावनिक संवाद साधावयाचा असतो. भावनेवर चालणाऱ्या स्त्रिया ह्या अधिक यशस्वीपणे असे नाते भगवंताशी जोडू शकतात. तिथे माऊली ही स्वतःस स्त्री समजून भगवंताची सख्या भावाने भावनिक नाते जोडतात. त्यांच्या या स्त्रीभावाचे प्रतीक म्हणूनच मीच मी एकली असे स्त्री रूपातील उद्गार आलेले आहेत.

**(क्रमशः)**

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं मे दृष्टिविषयो भव।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मे वाणीविषयो भव।। ४८ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या दृष्टीचा विषय हो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या वाणीचा विषय हो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रीगुरुणाभिपूजिते।**
**सुराराध्ये कुलाराध्ये समर्चिते नमो नमः।। ४९ ।।**

हे श्रीगुरुंनी अभिपूजित जगदंबिके, तुला नमस्कार असो. देवांची आराध्य, कुलाची आराध्य,समर्चिते अशा तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रव्या कथा मया तव।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं कथ्या कथा मया तव।। ५० ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी ऐकावी. श्रीरेणुके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी सांगावी.

**जगदम्ब नमस्तुभ्यं कुलरक्षणहेतवे।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं नित्यमुत्कर्षहेतवे।। ५१ ।।**

कुलाच्या रक्षणासाठीजगदंबिके, तुला नमस्कार असो. नित्यउत्कर्षासाठी श्रीरेणुके, तुला नमस्कार असो.




# फंगल इन्फेक्शन

ज्योतिर्मय साहित्य

**(मागील अंकावरून)**

स्टिरॉइड क्रीमचा वापर : काहीवेळा डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय स्टिरॉइड क्रीम वापरल्याने इन्फेक्शन वाढू शकते.

फंगल इन्फेक्शनची लक्षणे

फंगल इन्फेक्शनची काही सामान्य लक्षणे खालीलप्रमाणे आहेत:

त्वचेला खाज सुटणे.

त्वचेवर लाल रंगाचे गोल चट्टे येणे (उदा. दाद किंवा रिंगवर्म).

त्वचेतून पांढऱ्या रंगाचा पदार्थ निघणे (उदा. यीस्ट इन्फेक्शनमध्ये).

त्वचेला भेगा पडणे किंवा फटी पडणे.

जळजळ होणे.

सतत केस गळणे (टाळूवरील फंगल इन्फेक्शनमध्ये).

नखांचा रंग बदलणे किंवा नखे जाड होणे (नखांच्या बुरशीमध्ये)

फंगल इन्फेक्शनचे प्रकार:

ऍथलीट्स फूट : हा पायांवर होणारा सामान्य बुरशीजन्य संसर्ग आहे, ज्यात खाज सुटणे, जळजळ होणे आणि त्वचेला भेगा पडणे ही लक्षणे दिसतात.

दाद : हा अत्यंत संसर्गजन्य बुरशीजन्य संसर्ग आहे जो त्वचा, टाळू आणि नखांना प्रभावित करतो. यात लाल, गोलाकार पुरळ आणि खवलेयुक्त त्वचा दिसते.

जॉक इच : हा जांघेच्या भागात होणारा संसर्ग आहे, ज्यात खाज सुटते आणि लालसरपणा येतो.

कँडिडा इन्फेक्शन : हे यीस्ट (कँडिडा) मुळे होते आणि तोंडाच्या आत (थ्रश), योनीमार्गात किंवा त्वचेच्या पटलांमध्ये होऊ शकते.

फंगल इन्फेक्शनवर उपचार आणि घरगुती उपाय

फंगल इन्फेक्शनवर उपचार करण्यासाठी डॉक्टर अँटीफंगल क्रीम, पावडर किंवा गोळ्या देतात. पण काही घरगुती उपाय देखील फायदेशीर ठरू शकतात.

स्वच्छता : संक्रमित भाग साबण आणि पाण्याने दिवसातून दोनदा स्वच्छ करा. यामुळे संसर्ग पसरण्यापासून रोखण्यास मदत होईल.

कोरडे ठेवा : त्वचा नेहमी कोरडी ठेवा, विशेषतः आंघोळीनंतर. ओलसर ठिकाणी बुरशी वाढते.

मोकळे कपडे : सैल आणि सुती कपडे वापरा जेणेकरून त्वचेला हवा मिळेल.

लसूण : लसूण ठेचून ऑलिव्ह ऑइलमध्ये पेस्ट करून संक्रमित भागावर लावा. लसूणमध्ये अँटीफंगल गुणधर्म असतात.

हळद: हळदीचा लेप पाण्यात भिजवून संक्रमित भागावर लावा. हळदीमध्ये अँटीफंगल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात.

कडुलिंब : कडुलिंबाच्या पानांची पेस्ट बनवून खाज येणाऱ्या ठिकाणी लावल्याने इन्फेक्शन कमी होण्यास मदत होते.

कोरफड (आलो वेरा) : कोरफडीचे जेल त्वचेला शांत करते आणि बरे होण्यास मदत करते.

खोबरेल तेल : खोबरेल तेल बाधित भागावर लावल्याने खाज सुटणे आणि जळजळीपासून आराम मिळतो.

ऍपल सायडर व्हिनेगर : व्हिनेगर आणि पाणी समान प्रमाणात मिसळून कापसाच्या बॉलने लावा. यामुळे त्वचेचा पीएच संतुलित राहतो आणि बुरशीची वाढ रोखण्यास मदत होते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

रामचंद्रांचे जीवन रात्रंदिवस तिने पाहिले आहे. त्यांच्या कृतीतील विशुद्ध हेतू ती जाणते. पण कर्माची गती गहन आहे. धर्माचे निकष त्याचा निवडा करण्याचा अधिकार देवालाही नाही. तो अधिकार केवळ शास्त्राला आहे. जिथे व्यापकता असते तिथे विवक्षीत अर्थाचे आरोप आपण करून तोच धर्म आहे हे सांगू शकत नाही.

पूर्व मिमांसा म्हणते जो जगाला धारण करतो तो धर्म.धर्म शब्द व्यापक आहे.

शिक्षकाचा, विद्यार्थ्याचा, स्त्रीचा धर्म असे शब्द धर्माला जोडून आले की तदनुशंगिक अर्थ घ्यावा लागतो. हिंसा सुद्धा कधी कधी धर्म असतो.त्याला आपद्धर्म म्हणतात. धर्माची गती अत्यंत सूक्ष्म असते. धर्माची व्यापकता ही प्रचंड आहे.धर्म म्हणजे परमात्मा ते धर्म म्हणजे कर्म इथवर धर्माची व्याप्ती आहे. आपण धर्माचा जेव्हढा विचार करू त्यात आपणास न जाणवलेला धर्म अधिक व्यापक असतो.

सीता म्हणते तुम्ही अधर्माने वागता, आहात अशी मला शंका आहे. आपल्या आत्यंतिक हिताचा, प्रामाणिक विचार, केवळ पत्नीच करते, मुले सुद्धा नाहीत. ते आपल्या हिता पुरता विचार करतील. ब्रम्ह सूत्रावर भामती नावाची टीका आहे ती टीका प्रगल्भ आहे.प्रभू (मालक) सम्मीत, सुरुत (मित्र) संम्मीत उपदेश व पत्नी सम्मीत उपदेश. वेदाचा उपदेश हा प्रभु संम्मीत असतो. उपनिषदांचा, पुराणांचा उपदेश सुरूत सम्मीत उपदेश असतो. सुरूत म्हणजे (जो सदैव आपल्या हिताचा विचार करतो तो) **(क्रमशः)**

## फुलमाला....



रातराणी...

सावळ्या रात्रीवर
चांदण्यांची फुंकर
दरवळ विहरला
धुंद गंधित दूरवर

शुभ्र मनमोहक ही
रातराणी फुलली
आनंदाचे गीतासह
मनी मृदू उमलली

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज

# घरातला आनंद

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार मित्र हो,

आपल्या सर्वांच्या जीवनात आनंद भरलेला असतो, फक्त एक करावे लागते आपल्यासाठीचा हा आनंद कशात भरलेला आहे ? " हे शोधण्याचे काम स्वतःच्या आनंदासाठी धडपडणाऱ्या प्रत्येकानेच स्वतः करायला लागते.

आपल्या भावनिक विश्वात,पारिवारिक विश्वात पुरेपूर आनंद भरलेला आहे. जुन्या शब्दात सांगायचे झाले तर " जी मंडळी कुटुंब-वत्सल असतात, होम-सिक असतात, असे लोक, लोकांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून आपल्या पोरा-बाळात रमतात. घरातल्या घरात राहून ते आनंद मिळवतात.

याचा अर्थ ते माणुसघाणे असतात असा मुळीच नाही. अशा एखाद्या कुटुंबवत्सल गृहस्थाकडे तुम्ही जाऊन बघा- त्याच्या घरात आपले आनंदाने स्वागत होते, व्यवस्थित पाहुणचार होतो.




मित्रांनो,

माझ्या समकालीन मित्रांचे आणि आमच्या पारिवारिक जीवनाचे उदाहरण देतो, जे सत्तरच्या,ऐंशीच्या दशकातील आहे. पन्नास वर्षांपूर्वीचे हे पारिवारिक जीवन आजच्या मनाने बाळबोध वळणाचे होते.

महानगरीय जीवनशैली त्याकाळात आम्ही ऐकली नव्हती,पाहणे तर दूरची,स्वप्नवत गोष्ट होती.

तालुका, किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी वास्तव्य करणारी

आमची पिढी म्हणजे नीट-शहरी नागरिक" अशा स्वरूपाची होती.

जी नोकरी मिळालीय, ती खुर्ची रिटायर होई पर्यंत सोडायची नसते " मग नोकरी कोणत्याही क्षेत्रातली असो..ही नोकरी-निष्ठा वृत्ती" जणू सामाजिक संस्कार होता.

आहे त्यात समाधान मानायचे " हा फार महत्वाचा "आनंदीत राहण्याचा संस्कार " आमच्या या पिढीवर झालेला असावा,

असे आज मागे वळून पाहताना नक्कीच वाटते.

तसे पाहिले तर ही बहुसंख्य मंडळी आजच्या सोशल व्याख्येत बसवायची म्हटले तर..लोअर मिडल क्लास"मधली होती.

घरातल्या कर्त्या मुलाला एकदाची नोकरी लागली की

त्याकाळच्या "एकत्र कुटुंबाचा आनंद गगनात मावेनासा होई", कारण त्याकाळात "आर्थिक सुबत्ता " हा शब्द आमच्या कानी पडलेला नव्हता.

सत्तरच्या दशकात आणि तिथून पुढच्या काळात "तुटपुंज्या पगारात संसार भागवावा लागतो" या परिस्थितीत मात्र बदल होत गेला आणि "खाऊन-पिऊन सुखी" अशी

आनंदात राहणारी कुटुंबे गावोगावी दिसू लागली.

आर्थिक स्थिरता नसणे , आर्थिक विवंचना असणे " या दोन गोष्टींमुळे माणसांना आपल्या मनाला मुरड घालावी लागते,

ज्या गोष्टींनी आनंद होत असतो, त्या गोष्टी आवाक्यात नसल्यामुळे मन अधिकच दुःखी होऊन बसते.

ही मानसिक अवस्था १९९०च्या पुढच्या काळात जवळपास

नाहीशी झाली. जवळपास सगळ्याच बँकांनी जन-सामान्यासाठी सोप्या सोप्या कर्ज-योजना, कर्ज फेडण्याचा सुलभ परातफेडीच्या योजना मार्केटमध्ये आणल्या आणि इतके दिवस रिकामी-रिकामी दिसणारी घरे

एकदम चकचकीत होऊन गेली.

रंगीत टीव्ही, टू इन वन रेकॉर्डर , व्हीसीआर, फ्रीज, वॉशिंग-मशीन, लुना-मोपेड, बजाज-स्कुटर, एअर-कुलर, आणि लोड-शेडिंगवर मात करण्यासाठी इन्व्हर्टर "

अलिबाबच्या गुहेतील वाटणाऱ्या जादुई गोष्टी, सहजतेने

आल्या.आणि लोअर मिडल क्लास, मधून हायर मिडल क्लास"मध्ये गेल्याचा "मखमली आनंद" आमच्या पिढीने अनुभवला.

कंझुमर-लोन" हा जादूचा दिवा सगळ्यांना सापडत गेला,

आणि आमचे पारिवारिक जीवन झळाळून गेले. वर्षातून एकदाच येणारी दिवाळी, अशा बदलत्या घरात रोजच दिवाळी वाटू लागली.

कंझुमर-लोन" म्हणजे ऋण काढून सण साजरा करणे"

याची प्रत्यक्ष कृती होती हे खरे असले तरी कुणी मान्य करणार नाही कारण आनंदाला आणि हौसेला मोल नसते" हे पटवून देण्यास प्रत्येकजण तयारच असे.

यात आणखी एक मानसिक आनंद दडलेला असे..

"आता आमच्याकडे पण सगळ्या गोष्टी आल्यात म्हटलं!





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

### शांतिनिकेतन ते विश्वभारती

रवींद्रनाथांच्या युरोप दौऱ्यामध्ये त्यांना जो लिओनार्डो एल्म हर्स्ट या नावाचा तरुण भेटला होता, त्याची या श्रीनिकतनच्या कामात त्यांना मोलाची मदत झाली. एल्म हर्स्ट बद्दल मागील एका भागात मी आपल्याला सांगितले आहे त्याची आणि रवींद्रनाथांची भेट १९२० मध्ये न्यूयॉर्क येथे झाली. एल्म हर्स्ट हा कृषीअर्थशास्त्राचे शिक्षण घेणारा एक अत्यंत हुशार विद्यार्थी होता. रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्वाने तो भारावला होता. त्यांच्या गीतांजली या काव्यसंग्रहातील कविता त्याने वाचल्या होत्या. रवींद्रनाथांनाही हा उत्साही तरुण अतिशय आवडला आणि पहिल्याच भेटीत त्यांनी त्याला भारतात येण्याबद्दल निमंत्रण दिले होते. रवींद्रनाथांच्या मनात श्री निकेतन या संस्थेचा विकास करण्यासाठी आणि ग्रामीण भागाच्या भौतिक प्रगतीसाठी एल्म हर्स्टला बोलवण्याचा विचार होता. एल्म हर्स्ट हा खरोखरीच ध्येयवादी तरुण होता. आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आपल्या शब्दाला जागून त्याने रवींद्रनाथांना एक तार केली आणि माझे शिक्षण पूर्ण झाले आहे मी आता भारतात येऊ का असे विचारले ? यावेळी रवींद्रनाथांना आर्थिक चणचण मोठ्या प्रमाणात भासत होती. आपल्या संस्थेचे कार्य पुढे चालवण्यासाठी पैशाची तरतूद कशी करावी याची विवंचना त्यांना होती. आणि अशा वेळी युरोपातून कोणी शिकवण्यासाठी येणार असेल तर त्या व्यक्तीला पगार तरी कसा द्यावा हा प्रश्न त्यांच्यापुढे होता. त्यामुळे रवींद्रनाथांनी एल्म हर्स्टला उलट तार पाठवले की आता पैसे नाहीत तेव्हा येऊ नकोस. हा प्रसंग फार बोलका आहे या प्रसंगातून रवींद्रनाथ आणि एल्म हर्स्ट या दोघांचेही आरपार प्रामाणिक असलेले व्यक्तिमत्व आपल्याला स्पष्ट दिसते.

पैसे नाहीत हे कारण एल्म हर्स्टला भारतात येण्यापासून रोखू शकले नाही. आपल्या पदरचे पैसे खर्च करून तो भारतात रवींद्रनाथांच्या मदतीसाठी धावून आला. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी आपल्याजवळ पुरेसा पैसा नाही या गोष्टीचे रवींद्रनाथांना जराही वाईट वाटत नसे. त्याचे कारण हे होते की त्यांना हे माहिती होते की आपल्या कामाची किंमत गुणवत्तेवरून केली जाईल, संख्येवरून नाही. ग्रामीण भागातील समस्या जाणून घेऊन त्यावर प्रयोगाने अभ्यासाने अत्यंत काळजीपूर्वक उपाय शोधले पाहिजेत आणि मग ती योजना कार्यान्वित केली पाहिजे असे त्यांना वाटत होते. कार्याची ही ज्योत सदैव प्रज्वलित रहावे असे त्यांना वाटत होते.

आपल्या घरातील पिढीजात अशा सावकारीच्या व्यवसायाच्या निमित्ताने रवींद्रनाथांचा लहानपणापासून ग्रामीण भागातील लोकांशी जवळचा संबंध आला होता. त्यामुळे त्यांनी ग्रामीण भागातील लोकांच्या समस्यांची उत्तम जाण होती. ६ फेब्रुवारी १९२२ रोजी श्री निकेतनची स्थापना झाली. त्यांनी श्री निकेतनच्या उद्घाटन प्रसंगी केलेले भाषण त्याची साक्ष देते. ते म्हणतात, " खेडी जर समृद्ध व्हायची असतील तर त्यासाठी बाहेरील लोकांनी केलेली मदत फारशी उपयोगाची नाही. खेड्यातील लोकांनी स्वतःच आपल्या विकासासाठी प्रयत्न केले पाहिजे असे त्यांना वाटत होते. बाहेरून पाणी आणण्यापेक्षा वाळवंटात जर एखादा झरा निर्माण झाला तर तो सतत पुरवठा करतो. असा झरा कधीच वाटत नाही असे त्यांचे म्हणणे होते.

(क्रमशः)

## ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# मनावर नियंत्रण, बंधन मुक्त जीवन

ज्योतिर्मय साहित्य

एकदा स्वामी रामकृष्ण परमहंस हे आपल्या शिष्या सोबत चालत चालत नदीच्या किनाऱ्यावर आले. तेथे काही मासेमारी करणारे लोक नदीमधे जाळे फेकून मासे पकडत होते. स्वामी रामकृष्ण परमहंस तेथे एका मासेमारा जवळ जाऊन उभे टाकले आणि ते आपल्या शिष्यांना म्हणाले, तुम्ही ही मासे अतिशय लक्षपूर्वक बघा, त्यांची हालचाल बघा आणि तुम्हाला काय समजले ते सांगा ?

हे सर्व ऐकून आणि पाहून काही शिष्य म्हणाले, गुरूवर्य काही मासे जे जाळ्यात अडकली आहेत, ती शांत अणि निश्चिंत पडली आहेत, ती त्या जाळ्यातून बाहेर पडण्यासाठी मुळीच प्रयत्न करत नाहीत. काही मासे अडकलेल्या जाळ्यातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करत आहेत पण ते त्यांना जमत नाहीये आणि काही अडकलेली मासे प्रयत्नांची पराकाष्ठा करून बाहेर पडून मुक्तपणे पुढे जाऊन नदीमधे मस्त विहार करत आहेत. हे सर्व ऐकल्यावर स्वामी रामकृष्ण परमहंस म्हणाले हो आणि असेच माणसांचे असते. काही लोक




वरीलप्रमाणे पहिल्या श्रेणीमधे येतात, ज्यांचा आत्म्याने कायम बंधनात राहण्याचे स्विकारलेले असते.

दुसऱ्या श्रेणीमधे ती लोक येतात जी एखादया वीर पुरुषाप्रमाणे बंधनातून मुक्त होण्याचा प्रयत्न तर करतात पण मुक्ती मिळविण्यात अपयशी ठरतात तर तिसऱ्या श्रेणी मधील काही लोक अथक प्रयत्नाने ,जिद्दीने बंधनातून मुक्त होण्यात यशस्वी होतात. स्वामी रामकृष्ण परमहंस पुढे काही बोलण्याच्या आत एक शिष्य म्हणाला, गुरूवर्य आपणचौथ्या श्रेणी बद्दल काही बोलला नाहीत, तेंव्हा स्वामी म्हणाले, हो, चौथी श्रेणी ही आहे, जसे की काही मासे त्या जाळ्या जवळच येत नाहीत म्हणून ती अडकण्याचा प्रश्नच येत नाही. अशीच काही लोक असतात आपल्या जीवनात अश्या मोह जाळ्या जवळ येत नाहीत आणि कधी कुठे अडकण्याचा, फसण्याचा प्रश्नच येत नाही.

# भारत-नामिबिया : शक्तिशाली सहकार्याचे नवयुग

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)



द्विपक्षीय सहकार्याची नवी क्षितिजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची राजधानी विंडहोक येथे नामिबियाचे अध्यक्ष नेतुंबो नंदी-नदैत्वाह यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही नेते ऊर्जा, आरोग्यसेवा, शेती, सुरक्षा, संरक्षण आणि महत्त्वाची खनिजे बरोबरच शिक्षण, डिजिटल तंत्रज्ञान, यूपीआय भागीदारी, कृषी व उद्योग विकास, यांसारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये भरीव योगदानासाठी उपयुक्त चर्चा आणि विचारविनिमयातून चार सामंजस्य करार आकारास आले आहेत.

भारत आणि नामिबिया यांनी सहकार्याच्या नवीन क्षेत्रांचा शोध घेऊन आर्थिक भागीदारी अधिक दृढ करण्यासाठी वेगवेगळ्या चार सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली. उभयतांनी आरोग्य, औषध आणि नामिबियातील उद्योजकता विकास केंद्राची स्थापना आणि सहकार्य या क्षेत्रामध्येसुद्धा सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. नामिबियामध्ये उद्योजकता विकास केंद्र स्थापन करण्यासाठी भारताचे भक्कम सहकार्य लाभणार आहे. त्यामुळे नामिबियाच्या औद्योगीकरणास मोठा हातभार लागेल आणि मनुष्यबळ विकासाचे कार्यही त्यामुळे साध्य होऊ शकेल. नामिबिया भारताच्या ऊर्जा मोहिमांमध्ये सहभागी आहे तसेच प्रामुख्याने जैव ऊर्जा आघाडी, सौर ऊर्जा आघाडीचा तो एक सक्रिय भागीदार बनला आहे तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या क्षेत्रातसुद्धा भारत नामिबियाच्या पाठीशी भक्कमपणे उभा आहे. प्रगत माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रातसुद्धा भारताची नामिबियाला मार्गदर्शन लाभत आहे. व्यापार, ऊर्जा आणि पेट्रोकेमिकल क्षेत्रातील सहकार्य वाढविण्यावर दोन्ही देशांनी भर दिला आहे.




समारोप

नामिबियाच्या स्वातंत्र्यासाठी भारताने संयुक्त राष्ट्रसंघात आग्रह धरला होता तसेच स्वातंत्र्य चळवळीचे समर्थन केले होते, तेव्हापासून आजपर्यंत भारत नामिबिया यांच्यातील ऐतिहासिक मैत्री सतत वृद्धिंगत होत आहे. काळाच्या प्रवाहात दोन्ही देशांनी वसाहतवादाच्या विरोधात संघर्ष करून स्वातंत्र्य मिळविले. संविधान आणि लोकशाही कार्यप्रणालीवर दोन्ही राष्ट्रांचा दृढतर विश्वास आहे. आता संमत झालेल्या चार सामंजस्य करारांमुळे दोन्ही देशांतील उत्साह वाढला आहे. नामिबियाचे संस्थापक सॅम निजोमा यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी श्रद्धांजली वाहिली व त्यांच्या कार्याचा गौरव केला. या दूरदर्शी नेत्याने ना मिबियाची जडणघडण करताना प्रभावी योगदान दिल्याबद्दल पंतप्रधानांनी त्यांचा उल्लेख राष्ट्राचे शिल्पकार या शब्दात केला. पुढे स्वतंत्र नामिबियाच्या वाटचालीतील त्यांचा वारसा जगभराला नवी प्रेरणा देत असल्याचाही उल्लेख पंतप्रधानांनी केला. अशा प्रकारे भारत आणि नामिबिया यांच्यातील मैत्रीचा सेतू भक्कम झाला आहे आणि भविष्यात भारताच्या ऊर्जाविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि हिरे उद्योगाला लागणारा कच्चा माल पुरवठा करण्यासाठी नामिबिया भारताला निश्चितच नवे वरदान ठरू शकतो. पंतप्रधानांनी जगाच्या दक्षिण भागाच्या विकासासाठी या दौऱ्यात मांडलेले चिंतन अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे आणि भारत आता अलिप्त राष्ट्राचे नेतृत्व करत असताना प्रामुख्याने दक्षिणी जगाचे नेतृत्व करण्यासाठी पुढे सरसावला आहे. विकसित भारत जगाचे नेतृत्व करण्यासाठी भक्कमपणे पुढे वाटचाल करत आहे. हेच या पाच देशांच्या भेटीचे खरे मर्म आहे, सामर्थ्य आहे. नव्या जगात भारताचा भक्कम धाडसी आणि सामर्थ्यवान आविष्कार घडवीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दक्षिणी जगाला अष्टपैलू नेतृत्व देण्याच्या नव्या युगाचा प्रारंभ केला आहे, असे म्हणावे लागेल. त्यांचा हा पाच देशांचा दौरा अनेक अर्थाने यशस्वी ठरला आहे आणि नामिबियाची भेट ही तर आर्थिक व सांस्कृतिक दृष्टीने एक यशोशिखर म्हटली पाहिजे. या दौऱ्याचे यश नव्या धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे प्रकाशमान झाले आहे, यात शंका नाही.



## इंदापूरी निखारे

### दुसऱ्याचे सुख बघवत नाही...




ज्योतिर्मय साहित्य

यशाच्या शिखरावर जाण्यासाठी एकेक पायरी चढत जावी लागते तेव्हाच तुम्हाला शिखर गाठता येते व तुम्ही देव होता! यशाच्या शिखरावर गेल्यानंतर तेथे कायम राहण्यासाठीचा संघर्ष वेगळाच करावा लागतो आणि स्वतःचा नाश स्वतःच करून घेतलेली अनेक उदाहरणे पहात असतो! एका सुंदर शिल्पकाराने अतिशय सुंदर दगडामधून एक मूर्ती तयार केली आणि मूर्ती पर्यंत जाण्यासाठी सहज जाता येण्यासाठी सुंदर अशा पायऱ्या केल्या. लोकांना मूर्ती खूप आवडली आणि काही दिवसातच त्याची कीर्ती सर्वदूर झाली. लोकांचे लोंढेच्या लोंढे मंदिराकडे येऊ लागले आणि भक्त मंडळी मूर्तीला रोज दुधानी, मधानी, दह्यानी स्नान घालु लागले. त्याचे तिर्थ लोक पिऊ लागले. सोन्या चांदीचे दागिने, पूजाअर्चा,भरपूर पैसा, देणगी जमा होऊन ती दगडाची मूर्ती चक्क देव झाली होती! सगळ्यात पहिला पायरीचा पाषाण खूप नाराज झाला होता. एका भूकंपात मोठ्या दगडाचे तुकडे तुकडे झाले, म्हणजे माझ्याच भागांमधून तो देव झाला! आणि मी मात्र लोकांच्या लाथा खातोय, तू मस्त मजेत! त्या पायरीने मोठ्या देवाची प्रार्थना केली आणि देव प्रसन्न झाला! त्याने आपले गाऱ्हाणे देवासमोर मांडले, कालांतराने पुन्हा मोठा भूकंप होतो आणि मंदिर नष्ट होते. भक्तजन एकत्र येऊन परत मंदिर उभे करतात आणि त्या पहिल्या पायरीच्या पाषाणाची मूर्ती होते! तो खुश होतो.आता दुध, मधाने स्नान, भक्ती भावाने येणारे भक्त आणि मिळणारा सन्मान, व्वा! अगदी आनंदात! दिवस रात्र तुडवत जाणारे भक्त आता आपल्या समोर नतमस्तक होतांना पाहून आनंदून गेला. पण द्वेष आणि मत्सर मनातून जात नाही. काही दिवसांनी तो परत देवाला पुन्हा प्रसन्न करतो देव म्हणतो आता काय झाले? काही नाही देवा पण तो सगळ्यात खालचा पायरिवाला पण माझ्याच सारखा विचार करत असेल तर? त्या विचाराने झोपच लागत नाही! त्याने तुला प्रसन्न केले आणि माझ्यासारखी इच्छा व्यक्त केली तर?

त्यामुळे झोपच येत नाही! खरं तर तूच देव आहे पण मी तुझ्यावर विश्वास ठेवायला घाबरतो.

देव मंदपणे हसतो आणि म्हणतो द्वेष, मत्सर, अविश्वास ज्याच्या मनात असतो तो स्वतःच स्वतःला नष्ट करतो...




ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ



आठवणीतले बालपण

मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर

- संजय व्यापारी, संपादक,
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.

# हरफनमौला, कृतिशील विचारवंत मित्र विनय हर्डीकर

ज्योतिर्मय साहित्य

ज्येष्ट विचारवंत विनय हर्डीकर यांची माझी ओळख २०१८ साली १९ व्या सातारा जिल्हा ग्रंथ महोत्सवाच्या समारोपाचे प्रमुख अतिथी म्हणून आले त्यावेळी झाली. त्यापूर्वी त्यांचे वाचन संस्कृतीविषयी निगडीत आणि इतर लिखाण मी साधना साप्ताहिकात वाचत होतो आणि त्यामुळेच त्यांनी ग्रंथमहोत्सवात वाचन संस्कृतीविषयी बोलावे यासाठी आम्ही त्यांना आमंत्रण दिले होते.

त्यांचे ग्रंथमहोत्सवामधील भाषण सर्वांना मंत्रमुग्ध करणारे होते. त्यांचा व्यासंग आणि वाचन सर्वांनाच दिशादर्शक असे आहे. गेल्या सहा वर्षात ते माझे ज्येष्ट मित्र झाले ही माझ्यासाठी अभिमानास्पद घटना म्हणावी लागेल. त्यांची पंचाहत्तरी वेगवेगळया उपक्रमानी साजरी करण्यासाठी आम्ही एक संयोजन समिती स्थापन केली. त्यामध्ये राम कोल्हटकर,अनंत अभंग, समीर दुबळे, राजीव बसर्गेकर, मोहन गुजराथी, शिरीष चिटणीस, विनोद शिरसाट, रविमुकुल, हेमंत साठे, रमेश जाधव आणि मुक्ता गोडबोले यांचा समावेश होता. हरफनमौला, कृतिशील विचारवंत मित्र विनय हर्डीकर यांना २४ जून २०२४ ला ७५ वर्षे पूर्ण झाली. २०२४-२५ या काळात वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले.२३ जून २०२४ या दिवशी पं. समीर दुबळे आणि पं. उल्हास कशाळकर यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. २४ जून या दिवशी विनय हर्डीकर यांच्या एक्सप्रेस पुराण या पुस्तकाचे प्रकाशन झाले व त्या निमित्ताने विनय हर्डीकर यांची जाहीर मुलाखत झाली.२०२४-२५ या वर्षातही अनेक कार्यक्रम झाले. विनय हर्डीकर आणि राजीव बसर्गेकर यांच्या बरोबर ट्रेकिंग करणाऱ्यांचा एक स्नेहमेळावा १९ जानेवारी २०२५ रोजी नवी मुंबईमध्ये झाला. ९ फ ेब्रुवारी २०२५, या दिवशी अनंत अभंग यांच्या पुढाकाराने, भारताचे झपाट्याने होणारे शहरीकरण, या विषयावर विकेंद्रित शहरीकरण आणि अशा दोन सत्रांत परिसंवाद झाला. ६ एप्रिल २०२५ या दिवशी राम कोल्हटकर यांनी गायक कलाकाराची स्वतंत्र शैली कशी तयार होते?या विषयावर एका संगीत चर्चेचे आयोजन केले. पं. सत्यशील देशपांडे, पं. दिग्विजय वैद्य आणि प्रा. पूर्णिमा धुमाळे यांचा त्यात सहभाग होता.

संयोजन समितीच्या सुरुवातीच्या एका बैठकीमध्ये एक खूप छान कल्पना निघाली. विनय हर्डीकर यांच्याबद्दल लेख मागवून एक ग्रंथ तयार करूया. विनय हर्डीकर यांनी याला नकार देत अभिनव संकल्पना मांडली. जशी विनय हर्डीकर यांना ७५ वर्षे पूर्ण झाली, तशीच या वर्षी भारतीय प्रजासत्ताकालाही ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या पिढीतल्या, म्हणजे १९४७ ते १९६२ या वर्षांमध्ये जन्माला आलेल्या आणि निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये (स्वतः निवडून किंवा त्या क्षेत्रात योगायोगाने पडल्यामुळे) मनापासून काम करून, ते क्षेत्र वाढतानाही पाहिले; त्या क्षेत्रामध्ये स्वतःचा ठसा उमटवणारे काम केले, अशा अनुभवी व्यक्तींना विनंती करून, त्या क्षेत्रातील प्रगती आणि त्या व्यक्तीने केलेले काम यावर आधारित त्यांचे लेख मिळवावेत आणि त्यांचा संग्रह प्रसिद्ध करावा ही ती कल्पना. स्वतंत्र भारताच्या पहिल्या पिढीची कामगिरी-नव्या युगाचे पाईक हा विनय हर्डीकर ७५ अभिनंदन ग्रंथ २४ जून २०२५ रोजी प्रकाशित करण्यात आला. वेगवेगळ्या क्षेत्रात अभिनव कामगिरी केलेल्या मान्यवरांचे ३५ लेख यात आहेत. वाचन संस्कृतीशी निगडीत सर्व मराठी माणसांच्या संग्रही हा ग्रंथ असलाच पाहिजे एव्हडे या ग्रंथाचे मुल्य आहे.

साताऱ्याच्या ग्रंथ महोत्सवात २०१८ साली विनय हर्डीकर यांनी केलेल्या भाषणातील काही भाग असा. विनय हर्डीकर म्हणाले लोक पुस्तकावर बहिष्कार घालतात पण पुस्तकांनी लोकांच्यावर बहिष्कार






टाकला आहे का ? त्याचे एकही उदाहरण शोधून सापडणार नाही. जसे नदीबद्दल, पाणी जसे म्हणत नाही की, मी याच्या मुखी पडणार नाही. तस पुस्तक जो स्वीकारतो त्याला पुस्तके स्वीकारतात. पण पुस्तकाबद्दल अनेक प्रतिक्रिया ऐकायला मिळतात. मी जेव्हा पुण्यात जयकर ग्रंथालयात अभ्यासाला जायचो तेव्हा त्या ग्रंथालयामध्ये सगळ्यात पाठीमागे एका मोठ्या हॉलमध्ये फळ्यांच्या वरती मोठी जाड पुस्तके ठेवलेली असायची. ग्रंथालयात एक काळजी घ्यावी लागते की, कोणीही न नेलेली पुस्तके उघडावी लागतात, ती झटकावी लागतात आणि पुन्हा नीट ठेवावी लागतात. तर ते सेल्फ उंच होतं. त्यावरील पुस्तके काढण्यासाठी घोडा वापरला जायचा. एकदा एका शिपायाने घोडा धरला व दुसरा पुस्तके काढण्यासाठी वर चढला तर तो खालचा शिपाई म्हटला,जरा संभाळून बाबा पुस्तके जाड आहेत माझ्या डोक्यात पडल तर मी गेलोच समज. ही सुद्धा एक पुस्तकाला प्रतिक्रियाच होय. ''पुस्तक त्याच्या ज्ञानान जड असत तशीचं वजनानेही जड असतात.'' लहानपणीची मला एक आठवण आठवली. आमच्या घरी घराच्या शेजारी एक मोलकरीन बाई होत्या. त्या म्हणायच्या ''मला संध्याकाळी झोप येत नाही. तेव्हा मी माझ्या मुलाच्या दप्तरातील पुस्तक घेऊन कंदीलाच्या उजेडात वाचायची झोप येई पर्यंत''. ही सुद्धा पुस्तका बद्दलची प्रतिक्रियाच आहे.

माझे गुरुवर्य नागराजन् यांची बदली पुण्याहून हैद्राबादला झाली. तेव्हा त्यांना त्यांचे बिऱ्हाड हलवायला लागले. त्यांच्या घरात १०,०००च्या वर पुस्तके होती. ते वाचनप्रेमी होते. पुस्तकांची पॅकींग केली. तिकडे पोहचल्यावर ड्रायव्हरने गाडीतून पुस्तकांची पॅकींग खाली टाकली, तेव्हा ते म्हणालेतू काय दगड वाहतोस का विटा वाहतोस? यामध्ये काय आहे माहित आहे का?'' तर अशाही पुस्तकां बद्दल प्रतिक्रिया बघायला मिळतात. काही सुशिक्षित असेही म्हणतात की पुस्तके कशाला विकत घ्यायची? दुसऱ्याचं कोणाचं तरी वाचायला घेता येईल. त्यांना मला असं विचारायचं आहे की, तू नवीन शर्ट आणतो तो एकदा घातला की बदलतोस का? भगिनी नवीन साडी आणतात त्यांनी ती एकदा परिधान केली की, त्याचा उपयोग संपतो का? म्हणजे पुस्तक एक जीवनावश्यक वस्तू आहे. काही जण असे म्हणतात की, आता मला वाचवत नाही. डोळे चालत नाहीत. पण टी.व्ही चालू केला की, त्यांचे डोळे चालतात. मला हे काय कळतच नाही. अर्ध्या तासाची सिरीयल असेल तर त्यात १० मिनिटांची जाहीरात असते. राहिले २० मिनिटे त्यातली ०५ मिनिटे त्याचे पूर्वसुत्रच असते हे कसं बघवत लोकांना.

मी म्हणतो, ''रोज पुस्तक वाचा. टि.व्ही. कसा रोज बघता ? टि.व्ही हा भूतबाधेपेक्षा भयंकर आहे. ज्यांची पुस्तके खरेदी करण्याची आर्थिक स्थिती आहे ते म्हणतात की, रोजचा पेपर वाचून होत नाही. पुस्तके विकत घेवून काय करू ?

माझ्या आई-वडीलांना वाचनाची आवड होती. आईच्या माहेरी वाचण्याची आवड होती. मी जिथे वाढलो तिथे आसपास वाचनाची आवड असणारी मंडळी होती. वडीलांना चकाट्या पिटण्याची वा पत्ते खेळण्याची आवड नव्हती. त्यांना पुस्तके वाचनाची आवड होती. आई काम संपल की, वाचत बसायची. मला शिक्षक फार चांगले भेटले. मराठीच्या बाईंनी इ. ९ वीत त्यांची सगळी पुस्तकं वाचायला दिली. इंग्रजीच्या शिक्षकांनी १० वीत असताना उच्च दर्जाचे नाही पण प्रगत पुस्तके वाचायला दिली होती. ''पुस्तक नावाची वस्तू जगण्यासाठीची एक आवश्यक वस्तू आहे.'' असे संस्कार माझ्यावर झाले. आता मी पालकांना सांगतो, तुम्ही जर मुलांना वाचताना दिसला नाही तर तुमची मुले पुस्तके वाचणार नाहीत. त्यामुळे तुम्ही वाचा आणि मुलांना इतर अवधानांपासून वाचवा.

पुस्तके वाचणारी मित्रमंडळी जेंव्हा आपल्या संपर्कात येतात तेंव्हा आपणही त्यांच्या सांगण्यातील पुस्तके वाचत राहतो आणि समृद्ध होतो. विनय हर्डीकर यांच्यासारखी प्रचंड वाचन करणारी मित्रमंडळी प्रत्येकाच्या आयुष्यात आली पाहिजेत. अशा मित्रांमुळे माझ्या आयुष्यात जसा आनंदझरा निर्माण झाला आहे तसा प्रत्येकाच्या आयुष्यात निर्माण झाला पाहिजे.



# Early On (लवकर केलेली सुरुवात)

ज्योतिर्मय साहित्य

अर्ली ऑन हा उपक्रम ओंटारिया राज्याच्या अंतर्गत येतो. त्यांनी तो खास शून्य ते सहा वयोगटातील मुलांसाठी सुरू केलेला आहे. त्यासाठी वेगळे फंड आहेत. याच्या अंतर्गत त्या क्षेत्रातील मान्यवर प्रशिक्षित शिक्षक. आणि इतर मदतनीस नेमले आहेत. हा उपक्रम निरनिराळ्या भागातील कम्युनिटी सेंटर मध्ये चालवला जातो. या मध्ये इन डोअर (दरवाज्याच्या आतील प्रोग्रॅम) आउट डोअर (बाहेरील प्रोग्रॅम) आणि ऑनलाईन अशा तीन प्रकारचे प्रोग्रॅम असतात. हा संपूर्णतः फ्री ऑफ कॉस्ट (मोफत)आहे. फक्त आत जाताना आणि बाहेर येताना नोंद करणे आवश्यक असते. साधारण दिवसातील पाच तास हा कार्यक्रम सुरू असतो. आपल्या पाल्याला आपल्याला शक्य आहे त्या वेळी आणि तुम्हाला जमेल तितके तास ते तुम्ही घेऊन जाऊ शकता.

या सेंटर मध्ये प्रत्येक वयोगटाची सुंदर सुंदर खेळणी खेळण्यासाठी उपलब्ध असतात. यामध्ये बॅटरीवर चालणारे किंवा बटणावर चालणारे कुठलेही खेळणे नसते. त्यांच्या वाढीला चालना देईल आणि नैसर्गिक रीत्या त्यांच्यात छान प्रगती होईल आणि सहज हसत खेळत शिक्षण मिळेल यावर भर दिलेला असतो. जसे की लाकडी खेळणी, बाहुल्या, स्वयंपाकाचा अगदी ओव्हन, गॅस, फ्रिजसह सगळा संच, स्वयंपाक करण्यासाठी प्ले डो (खेळण्यातील कणीक) पेंटिंगचे सामान, आरसे, छोट्या बाळांसाठी छोटे घर, गाड्या हे तर असतेच त्या बरोबर एक झाड आणि त्या भोवती माती ही असते. मातीत खेळण्यासाठी वेगळी खेळणी. खेळून झाल्यावर माती नीट आत टाकण्यासाठी छोटा झाडू, छोटे प्लांट्स पाने, फुले, प्राणी, वाद्ये. एकूणच किती सांगेल तितके कमीच आहे. तुमचे पाल्य त्याच्या आवडीच्या खेळात सहज रमेल आणि त्याच्या आवडीला चालना मिळेल ते सगळे खेळ इथे असतात.

थोड्या थोड्या वेळाने तिथले शिक्षक सर्कल करून हसत खेळत मुलांना पाने फुले, ऋतू, विरुद्धार्थी शब्द, भावना, निसर्ग, प्राणी, शरीरातील अवयव अशा अनेक गोष्टी बालसुलभ नृत्यातून त्यांच्या समवेत करून त्यांच्या पर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करतात. या सगळ्या आनंदात आपणही सहज सामील होतो. प्रशिक्षित शिक्षकाचे कितीही वय असले तरी मुलांना त्यांना एकेरी नावाने संबोधायची सवय लावली जाते त्यामुळे त्यांच्यात मैत्री होते. स्वच्छता, टापटीप बघण्यासारखी असते. मध्ये खाण्यासाठी मुलांचा खाऊ आपण घेऊन जाऊ शकतो. त्या वेळी कसे हात धुवून खायचे हे शिकवले जाते. शेवटी येताना आपला खेळ आपण सगळ्यांनी गाणे ऐकत, म्हणत (क्लीन अप साँग) कसा आवरायचा हे ही दाखवितात आणि सहज मुले करतातही. शेवट मुलांच्या आवडीच्या गाण्यांनी केला जातो. त्यांना काय ऐकायचे आहे हे विचारून त्यांच्याइतके छोटे होऊन नाच करतात.

इथे प्रत्येक सेंटरला आंतरराष्ट्रीय वाचनालय आहे. इथे जगातील प्रत्येक संस्कृतीची पुस्तके मिळतात. सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवून त्यांनी हे वाचनालय काढले आहे. उदाहरणार्थ




आपणही आपल्या दिवाळी बद्दलचे पुस्तक ठेवण्याबद्दल सुचवू शकतो. चित्रे आणि त्यातील माहिती बघून मुले पटापट शिकू शकतात. एका वेळेला पन्नास पुस्तके नोंद करून आपण घरी आणू शकतो.. अतिशय स्वच्छ शांत वातावरण आणि भरपूर पुस्तके असलेली ही लायब्ररी बघून आश्चर्य वाटते.

आउट डोअर (बाहेरील कार्यक्रम) मध्ये स्विमिंग (पोहणे), आईस स्केटिंग (बर्फावरून घसरणे) गार्डनिंग, पाने फुले गोळा करणे (झाडे लावणे) हे सगळे शिकवीतात. हे शिकवताना प्रत्येक मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी वेगळा प्रशिक्षक असतो. तो त्यांची नीट काळजी घेऊन शिकवितो. त्या मुळे ही मुले सर्वार्थाने आनंद घेत नकळत घडत जातात. खेळता खेळता शिकतात. हे सगळे खूप व्यवस्थित नीट विचारपूर्वक आखलेले असते. मी माझ्या नाती बरोबर जाऊन खूप वेळा हा आनंद घेतला. यामधून मलाच खूप शिकायला मिळाले.

तिथले प्रशिक्षक आणि आमच्या सारखेच आपल्या पाल्याबरोबर आलेले पालक मग ते कोणत्याही देशाचे असोत त्यांचे मृदू आणि अगत्यशील वागणे माझ्या नेहमीच लक्षात राहील..आणि तितकीच वेगवेगळ्या वयाच्या मुलांनी बहरलेले ते नंदनवनही राहील...

# ''पाणी'' ठरला वर्षातील सर्वोत्कृष्ट चित्रपट

## सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक सर्वाधिक पुरस्कार

ज्योतिर्मय साहित्य

राजश्री एंटरटेनमेंटने आता 'पाणी' या चित्रपटाच्या माध्यमातून मराठी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला असून त्यांनी पर्पल पेबल पिक्चर्स आणि कोठारे व्हिजन प्रा. लि. यांच्या सहकार्याने 'पाणी'ची निर्मिती केली आहे. राजश्री एंटरटेनमेंटचा हा पहिलाच मराठी चित्रपट असून त्यांनी पदार्पणातच इतिहास रचला आहे. आदिनाथ कोठारे दिग्दर्शित हा चित्रपट मराठवाड्याच्या 'जलदूत' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हनुमंत केंद्रे यांच्या जीवनावर आधारित आहे. हा केवळ एक बायोपिक नसून समाजाला पाण्याचे महत्त्व पटवून देणारा एक सशक्त आणि संवेदनशील चित्रपट आहे. 'पाणी'ने आजवर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार, विविध पुरस्कार सोहळ्यांमध्ये २५ मानाचे पुरस्कार पटकावले आहेत. यामध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट आणि सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक अशा प्रमुख विभागांचा समावेश आहे. या यशामुळे 'पाणी' हा चित्रपट वर्षातील सर्वाधिक चर्चेत असलेला मराठी चित्रपट ठरला आहे.




चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच या चित्रपटाला पर्यावरण संरक्षण/संरक्षणावरील सर्वोत्कृष्ट फीचर फिल्मसाठी ६६ वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार देण्यात आला. तर न्यूयॉर्क फिल्म फेस्टिवलमध्ये आदिनाथ कोठारे याला सर्वोत्कृष्ट कलाकाराचा पुरस्कार मिळाला. नुकत्याच झालेल्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात पाणी ला सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट, पटकथा, सर्वोत्कृष्ट संकलन, सर्वोत्कृष्ट साऊंड डिझाईन, सर्वोत्कृष्ट बॅकग्राऊंड स्कोअर या विभागात पुरस्कार मिळाले. झी चित्र पुरस्कार सोहळ्यात सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट पटकथा, सर्वोत्कृष्ट गीतकार, सर्वोत्कृष्ट ध्वनिमुद्रण, सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शक तर रेडिओ सिटी सिने अवॉर्ड मराठी - सिझन ८ मध्ये सर्वोत्कृष्ट गायक, सर्वोत्कृष्ट चित्रपट हे पुरस्कार पटकावले. म. टा. सन्मानमध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट पटकथा, सर्वोत्कृष्ट संगीत, सर्वोत्कृष्ट गीतकार असे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. एनडीटीव्ही मराठी अवॉर्ड्समध्ये पाणी ने सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट कथा, सर्वोत्कृष्ट संकलन विभागात बाजी मारली.

दिग्दर्शक आदिनाथ कोठारे यांनी आपल्या भावना व्यक्त करत म्हटले, ''या यशाचे श्रेय संपूर्ण टीम आणि प्रेक्षकांना जाते. प्रेक्षकांनी आम्हाला जे प्रेम दिलं, त्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. नेहा बडजात्या, प्रियांका चोप्रा जोनस, डॉ. मधू चोप्रा, सिद्धार्थ चोप्रा यांचे मनापासून धन्यवाद. त्यांच्यामुळेच आज हे शक्य होऊ शकले.

ज्यांना 'पाणी' चित्रपटगृहात पाहायची संधी मिळाली नाही, त्यांना हा चित्रपट आता अमेझॉन प्राईमवर मराठीसह हिंदी भाषेतही उपलब्ध आहे. सामाजिक विषयावर आधारित असला तरी, या चित्रपटात मनोरंजन, संगीत, आणि उत्तम अभिनयाची त्रिवेणी अनुभवता येणार आहे.

आदिनाथ कोठारे दिग्दर्शित पाणी चित्रपटात आदिनाथ कोठारे, रुचा वैद्य, सुबोध भावे, रजित कपूर, किशोर कदम, नितीन दीक्षित, सचिन गोस्वामी, मोहनाबाई, श्रीपाद जोशी, विकास पांडुरंग पाटील अशी तगडी स्टारकास्ट आहे. या चित्रपटाची कथा नितीन दीक्षित आणि आदिनाथ कोठारे यांची असून नेहा बडजात्या, दिवंगत रजत बडजात्या, प्रियांका चोप्रा जोनस, डॉ. मधू चोप्रा या चित्रपटाचे निर्माते आहेत तर महेश कोठारे, सिद्धार्थ चोप्रा या चित्रपटाचे सहयोगी निर्माते आहेत.

# शब्दांपेक्षा कृतीवर विश्वास-डॉ. अनुपम टाकळकर

## आयएमए कनेक्ट उपक्रमांतर्गत 'आरंभ' शाळेत विशेष मुलांचे आरोग्य परीक्षण, इंडियन मेडिकल असोसिएशनचे समाजाभिमुख कार्य पुन्हा एकदा अग्रभागी

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - इंडियन मेडिकल असोसिएशन , छत्रपती संभाजीनगर शाखेच्या आयएमए कनेक्ट या सामाजिक उपक्रमांतर्गत आज आरंभ शाळा येथे स्वतःच्या जगात रममाण असलेल्या मुलांसाठी विशेष आरोग्य परीक्षण व समुपदेशन सत्र घेण्यात आले. हा उपक्रम आयएमए कनेक्ट मालिकेतील चौथा कार्यक्रम असून, याआधी मातोश्री वृद्धाश्रम, भगवानबाबा अनाथाश्रम व विशेष मुलांची निवासी केंद्रे येथे सेवा पोहोचविण्यात आली होती. विशेष म्हणजे, हा उपक्रम आयएमएच्या ग्रामीण सेवा उपक्रमांपेक्षा वेगळा असून, शहरी भागातील दुर्लक्षित घटकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचवण्याचा प्रयत्न यातून दिसतो. ग्रामीण भागात आओ गाव चले या उपक्रमांतर्गत तीन गावे दत्तक घेण्यात आलेली आहेत आणि



तेथे मोठ्या प्रमाणावर काम सुरूच आहे.

आयएमए छत्रपती संभाजीनगर ही शाखा केवळ दवाखान्यापुरती मर्यादित न राहता, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्यासाठी नेहमीच पुढे असते. 'Caring Beyond Clinics' हे ब्रीदवाक्य प्रत्यक्ष कृतीतून साकार करणाऱ्या या शाखेचे विविध उपक्रम राज्यभर उदाहरण म्हणून ओळखले जात आहेत. आयएमए अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर म्हणाले आयएमए कनेक्ट हा केवळ आरोग्य परीक्षणापुरता मर्यादित उपक्रम नाही, तर तो संवेदनशील समाजाच्या जडणघडणीचा एक प्रयत्न आहे. ही मुलं वेगळ्या गरजा घेऊन आपल्यासमोर येतात, आणि आपण डॉक्टर म्हणून त्यांच्या मनाशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा कार्यक्रम हृदयस्पर्शी ठरला. विशेषतः अशा गरजू आणि दुर्लक्षित गटांमध्ये वैद्यकीय सेवा पोहोचवणे हे आमचे ध्येय आहे. केवळ गावांमध्ये नव्हे तर शहरातील दुर्लक्षित घटकांनाही या सेवेचा लाभ मिळालाच पाहिजे.''

आयएमए सचिव डॉ. योगेश लक्कास यांनी सांगितले आयएमए कनेक्ट अंतर्गत भविष्यात अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमात डॉ. दत्ता कदम (अध्यक्ष - आएमए कनेक्ट), डॉ. गौरव साळवे (संयोजक) यांच्यासह आयएमएचे अनेक सन्माननीय सदस्य सहभागी झाले होते. ''आओ गाव चले'' उपक्रमही यशस्वीरीत्या सुरू याच वेळी, आयएमएच्या दुसऱ्या उपक्रमांतर्गत रविवार, २१ जुलै रोजी ग्रामीण भागातील ''आओ गाव चले'' ह्या उपक्रमासाठी नियोजन करण्यात आले आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559